| 4. | 50 | 30 days or less, but more than 15 days, after formally-notified last date of admission |
| 5. | 00% | More than 30 days after formally-notified last date of admission |

**Note -**

In case of (1) in the table above, the college/Institute concerned shall deduct an amount not more than 5% of the fees paid by the student, subject to a maximum of Rs.5000/- as processing charges from the refundable amount.

Fees shall be refunded by all colleges/institutions to eligible students within fifteen days from the date of receiving a written application from him/her in this regard.

## ■ सर्व प्रकारच्या स्कॉलरशिप

*** सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप नोटीस National Portal Scholarship**

इयत्ता१२ वी परीक्षेत किमान ८०% टक्के गुण आवश्यक

*** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती (ई.बी.सी.) योजना -**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना (ई.बी.सी.) व एस.सी.एस.टी., व्हीजेएनटी, ओबीसी या प्रवर्गातील स्कॉलरशिप, अपंग स्कॉलरशिपचे फार्म **Mahadbt online Portal** वर ऑनलाईन भरुन त्याची

हार्डकॉपी सर्व कागदपत्रांसह कार्यालयात जमा करावी लागते.

**※ बी. सी. स्कॉलरशिप -**

**एस. सी, व्हीजेएनटी, ओबीसी, एसबीसी सिनिअर व ज्युनिअर विद्यार्थी / विद्यार्थिनींना -**

**※ बी. सी. फ्री - शिप -**

ज्यांचे पालक नोकरी करीत असतील त्यांनी नोकरीच्या ठिकाणचा उत्पन्नाचा दाखला आणणे आवश्यक, संपूर्ण पगार, फॉर्म नंबर १६.

एस. सी. साठी पालकाचे उत्पन्न रुपये २,००,०००/– पेक्षा अधिक आहे. व्हीजेएनटी, ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी पालकांचे उत्पन्न रुपये १,५०,०००/– पेक्षा अधिक आहे. त्यांनी बी.सी. फ्री–शिपसाठी अर्ज करणेचे आहेत. अशा विद्यार्थ्यांनी नॅशनल बँकेत खाते उघडणेची आवश्यकता आहे.

**※ शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती -**

Link : **www.unishivaji.ac.in** या वेबसाईटवर **Shivaji University Merit Scholarship** या संकेतस्थळावर उपलब्ध

बी.ए., बी. कॉम व बी. एस्सी. भाग १ मध्ये शिकणारे व फेब्रुवारीतील परीक्षेत पहिल्या प्रयत्नात पास होवून किमान ७० टक्के असणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत. परंतू विद्यापीठातील सर्व सलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्याची एकत्रित गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार शिष्यवृत्ती दिली जाते.

**■ बी. ए., बी. कॉम. व बी. एस्सी. भाग २ व ३ मधील विद्यार्थ्यासाठी :-**

- आर्थिक दुर्बल गटातील शिष्यवृत्ती
- निराधार गटातील शिष्यवृत्ती
- अंध, अपंग व कर्णबधीर / मुकबधीर गटातील शिष्यवृत्ती
- गुणवंत खेळाडू गटातील शिष्यवृत्ती
- सोशल सायन्सचे विद्यापीठाची शिष्यवृत्ती
- ग्रामीण भागातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना देणेत येणारी शिष्यवृत्ती
- गणित व भौतिकशास्त्र शिष्यवृत्ती
- एकलव्य शिष्यवृत्ती – पदव्युत्तर पदवी एम. ए. विद्यार्थ्यासाठी

## ■ विद्यार्थी/विद्यार्थिनी सहाय्य निधी

या सहाय्य निधीसाठी एकूण फी मध्येच प्रत्येक विद्यार्थ्याकडून प्रती वर्षी २५ रुपये आकारण्यात येतात या निधीतून महाविद्यालयाच्या गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य दिले जाते.

**※ अन्य स्कॉलरशीप -**

१) सौ. क्रांतीदेवी किसनराव कुराडे शिष्यवृत्ती –

शिवराज विद्या संकुलात प्रवेश घेतलेल्या गरीब व होतकरु विद्यार्थीचे पैशाअभावी शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरिता सौ. क्रांतिदेवी कुराडे शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून सुरु करण्या येत आहे. या शिष्यवृत्तीसाठी महाविद्यायाचे अर्थशास्त्र विभागाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. एस. जी. मुंज यांनी दरवर्षी रुपये २५,००० देण्याचे जाहीर केले आहे. या शिष्यवृत्तीसाठी अन्य दाते ही मदत करणार आहेत. जमा होणाऱ्या रकमेतून शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

२) एस. आर. जिंदाल फाऊंडेशन (सर्व विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या साठी ७०% हून अधिक गुण व मर्यादित उत्पनाची अट असते.)

३) एल. आय. सी. गोल्डन ज्युबिली

४) बॅ. पी. जी. पाटील व सुमतीबाई पाटील स्कॉलरशिप, सातारा

५) कर्नाटक राज्यातील एस. सी., एस. टी. प्रवर्गातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप दिली जाते.

६) हिरा शुगर सहकारी साखर कारखाना, संकेश्वर यांचेकडून स्कॉलरशिप दिली जातेि

**⁕ फ्रेश (नवीन अर्जासाठी) –**

शाळा सोडलेचा दाखला, मागील परीक्षेच्या मार्कलिस्टची साक्षांकित प्रत, दहावी मार्कलिस्ट सत्यप्रत, प्रवेश पावती प्रमाणे प्रवेशाची तारीख व बँक पासबुकाची पहिल्या पानाची झेरॉक्स, मा. तहसिलदार उत्पन्नाचा दाखला व जातीच्या दाखल्याची झेरॉक्स

**⁕ नूतनीकरण अर्जासाठी -**

मागील परीक्षेच्या मार्कलिस्टची साक्षांकित झेरॉक्स, दहावी मार्कलिस्ट सत्यप्रत व प्रवेश पावती झेरॉक्स. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स व बँक पासबुकाची पहिल्या पानाची झेरॉक्स, नापास विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचा मूळ दाखला जोडणे आवश्यक.

## ■ सर्व प्रकारच्या स्कॉलरशिपसाठी (Mahadbt online Portal) पोर्टल

## ■ अभिनंदनीय सुयश

- **सन २०२३-२४ मध्ये आमच्या महाविद्यालयातील १९७ विद्यार्थ्यांना केंद्रशासनाची सेंन्ट्रल सेक्टर शिष्यवृत्ती प्रत्येकी १०,००० रु. प्रमाणे मिळाली .**



# * महाविद्यालयात उपलब्ध भौतिक आणि शैक्षणिक सुविधा

## ■ महाविद्यालयाचे कार्यालय

महाविद्यायाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सक्षम कार्यालयाची गरज असते. महाविद्यालयाचे कार्यालय संगणीकृत आहे. प्रवेश प्रक्रिया, परीक्षा व शिष्यवृत्ती संदर्भातील अद्ययावत माहिती **shivarajcollegeoffice.blogspot.com** या ब्लॉगद्वारे प्रसिध्द केली जाते. तसेच महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, विद्यापीठ व इतर संस्थांच्या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना कार्यालयामार्फत दिला जातो. विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया व शिष्यवृत्तीची माहिती मिळावी यासाठी कार्यशाळा, मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच कार्यालयामार्फत विद्यार्थी, पालक, शिक्षक विमा योजनेची अंमलबजावनी काटेकोरपणे केली जाते.

कार्यालयामार्फत सुट्टीच्या दिवशी विशेष कॅम्प आयोजित करुन बाहेरगावी नोकरीस असणाऱ्या आजी व माजी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे दाखले व कागदपत्रे उपलब्ध करुन दिली जातात.

## ■ वर्गखोल्या

महाविद्यायात प्रशस्त, हवेशीर, सर्व सोयीनीयुक्त पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध. तंत्रज्ञानाचा वापर करुन अध्ययन-अध्यापन करण्यासाठी वर्गखोल्या **ICT** सुविधा उपलब्ध.

## ■ ग्रंथालय

- सर्व वाचकांना ग्रंथालय मुक्तद्वार.
- ८५३४२ हजार ग्रंथांनी समृद्ध.
- ४९ नियमित नियतकालिके.
- सकाळी ७.२० ते सायं. ६.०० पर्यंत पुस्तके देवघेव.
- परिक्षा पूर्व व परीक्षा कालावधीत अभ्यासिका सकाळी ७.०० ते रात्रौ १२.०० पर्यंत.
- गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पुस्तक पेढीतून पुस्तक संच.
- ३०% रक्कम भरुन पुस्तक संच मिळण्याची सोय.
- दोन पुस्तके एका वेळी मिळण्याची सोय (एक क्रमीक, एक संदर्भ)
- स्पर्धा परीक्षेची ५००० पुस्तके, स्पर्धा परीक्षा तयारीसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सोय.
- अभ्यासिकेमध्ये प्रश्नपत्रिका संच मिळेल. आवश्यक असल्यास सॉफ्टकॉपीमध्ये प्रश्नपत्रिका संच मिळेल.
- ग्रंथालयातील वाचन साहित्य शोधासाठी WEB OPAC उपलब्ध.
- Keywords च्या माध्यमातून वाचन साहित्य शोधण्याची सोय.
- N-LIST च्या माध्यमातून 6,00,000+e-books, व 6000+e-journals.
- नव्या वाचकांसाठी Library Induction Programme.
- संशोधन करणाऱ्या व्यक्तींना ग्रंथालय नेहमी खुले.
- विद्यार्थी, शिक्षक या व्यतिरिक्त समाजातील अन्य वाचकांना अनामत घेऊन पुस्तक देवघेव.
- कॉ. गोविंदराव पानसरे अध्यासन.

## ■ प्रयोगशाळा

महाविद्यालयातील विज्ञान शाखेकडे शिकविल्या जाणाऱ्या विविध विषयांसाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा आहेत. विद्यार्थ्यांना संशोधन आणि व्यावहारिक शिक्षणाचा अनुभव प्राप्त होतो. भौतिकशास्त्र प्रयोगशाळेत प्रगत उपकरणे जसे की स्पेक्ट्रोमीटर, ऑसिलोस्कोप आणि शास्त्रीय यांत्रिकी, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम यासह आवश्यक सर्व उपकरणे उपलब्ध आहेत. रसायनशास्त्र प्रयोगशाळा कलरीमीटर आणि क्रोमॅटोग्राफी, पोलारोमीटर, स्पेक्ट्रोफोटोमीटर

यासारख्या  विश्लेषणात्मक उपकरणांनी सुसज्ज आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना Organic, Inorganic and Physical Chemistry मधील प्रयोग करतात.

वनस्पतिशास्त्राच्या विद्यार्थ्यांना सूक्ष्मदर्शक, इनक्यूबेटर आणि वनस्पती वाढीचे कक्ष असलेल्या सुसज्ज प्रयोगशाळेत फायदा होतो, ज्यामुळे Plant Physiology आणि वर्गीकरणाचा अभ्यास करणे सुलभ होते. प्राणीशास्त्र प्रयोगशाळेत, विद्यार्थ्यांना विच्छेदन सूक्ष्मदर्शक आणि प्राण्यांच्या वर्तन निरीक्षण सेटअपमध्ये प्रवेश असतो, ज्यामुळे त्यांना शरीरशास्त्र, अनुवंशिकता आणि पर्यावरणशास्त्र यासह प्राणी जीवशास्त्राच्या विविध पैलूंचा शोध घेता येतो.

महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्राची प्रयोगशाळा अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे. विद्यार्थी सूक्ष्मजीवांची रचना, कार्य आणि त्यांच्या वातावरणातील परस्परसंवादाचा अभ्यास करण्यासाठी लॅमिनेर फ्लो हूड, ऑटोक्लेव्ह आणि फ्लोरोसेंट मायक्रोस्कोपने सुसज्ज असलेल्या विशेष उपकरणांचा वापर करतात. मायक्रोबियल फिजिओलॉजी, जेनेटिक्स आणि बायोटेक्नॉलॉजीमध्ये प्रयोग करण्यासाठी या प्रयोगशाळा आवश्यक आहेत.

एकूणच, सर्व प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना संशोधन, शैक्षणिक आणि उद्योगात करिअर करण्यासाठी आवश्यक अनुभव आणि व्यावहारीक कौशल्य प्रधान करतात.

### ■ संगणक प्रयोगशाळा

महाविद्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानासह प्रशस्त १० संगणक प्रयोगशाळा आहेत. Letest Configuration सह २३२ संगणक प्रयोगशाळेमध्ये विद्यार्थ्यांना वापरासाठी उपलब्ध आहे. सर्व प्रयोगशाळेतील संगणक Local Area Network ने जोडले आहेत. खाजगी इंटरनेट प्रोव्हाडरच्या १०० MBPS च्या दोन कनेक्शन द्वारे प्रयोगशाळेतील प्रत्येक संगणकास इंटरनेट कनेक्टीव्हिटी दिली आहे.

प्रात्यक्षिक LCD Projector  च्या माध्यमातून दृकश्राव्य व interactive पध्दतीने घेतले जाते. याबरोबर स्वत:च्या Laptop वर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हाय स्पीड WI/FI कनेक्शन उपलब्ध. याचबरोबर आधुनिक Laser, Inject कलर प्रिंटर, स्कॅनर, कॉपिअर, इत्यादी आवश्यक साधनांची उपलब्धता विद्यार्थ्यांसाठी केली आहे.

### ■ भाषा प्रयोगशाळा (Language Laboratories) -

महाविद्यालयात सुसज्ज भाषा प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. ज्याद्वारे भाषा कौशल्ये सहज आत्मसात करता येतात. भाषा प्रयोगशाळा LSRW कौशल्यांच्या कार्यपध्दतीवर आधारित आहे जी ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहणे. भाषा प्रयोगशाळा हे मुख्यत: विद्यार्थ्यांसाठी भाषेच्या मूलभूत गोष्टी शिकण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी एक शैक्षणिक साधन आहे. डिजिटल लँग्वेज लॅब विद्यार्थ्याला व्यावहारिक पध्दतीने भाषा कौशल्यांसह संवाद, अभ्यास, प्रयोग करण्यास अनुमती देते. ही प्रयोगशाळा भाषा कौशल्यांवर लक्ष केंद्रित करते आणि विद्यार्थ्यांमधील कौशल्ये कार्यक्षमतेने विकसित करते. लॅबमध्ये Advantech सॉफ्टवेअर हे तंत्रज्ञान मिश्रण आहे जे इंग्रजी कौशल्ये सहज आणि जलद शिकण्यास मदत करते.

### ■ WI / FI सुविधा

महाविद्यालयाच्या परिसरात 100 mbps ची WI/FI सुविधा उपलब्ध.

### ■ मैदान व जिमखाना

आमच्या महाविद्यालयाचे भव्य क्रीडांगण लाभले आहे.ॲथलेटीक्स, क्रिकेट, टेबल टेनिस, कबड्डी, फुटबॉल, व्हॉलीबॉल,तलवारबाजी, ज्युदो, कुस्ती, हॉकी, मल्लखांब अशा अनेक खेळांची सोय जिमखाना विभागाकडे आहे. ॲथलेटीक्स प्रमाणे भारतीय खेळ व बैठे खेळ यांचीही सोय आहे. विद्यापीठ स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धेमध्ये विद्यार्थांचा उल्लेखनिय सहभाग होतो व पारितोषिक प्राप्त होतात,महाविद्यालयाच्या वतीने प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन व महत्वाचे समारंभ जिमखाना विभागाकडून आयोजित केली जातात. उदयोन्मुख खेळाडूंना विशेष प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी जिमची सुविधा व स्वतंत्र इमारत आहे. आमच्या महाविद्यालयाने ॲथलेटीक्समध्ये सलग ११ वर्षे विद्यापीठाची जनरल चॅम्पीयनशीप मिळवलेली आहे. तसेच पोलीस व आर्मी भरतीचे प्रमाण लक्षणिय आहे. आमचे विद्यार्थी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. तसेच विद्यापीठ स्तरावर पहिल्यांदा

झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास पहिले सुवर्णपदक आमच्या महाविद्यालयाने मिळवून दिले. शिवछत्रपती पुरस्कार सारखे अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त झाले आहेत.शिवाजी विद्यापीठाला पहिल्या खेलो इंडिया राष्ट्रीय स्पर्धेचे पहिले सुवर्णपदक मिळवले.

## ■ सेमिनार हॉल

महाविद्यालयामध्ये सर्व सोयीनियुक्त, प्रशस्त व डिजीटल सेमिनार हॉल उपलब्ध आहेत. यामध्ये कार्यक्रम, कार्यशाळा, सेमिनार, अधिवेशन घेण्यास उपयुक्त ठरते.

## ■ राष्ट्रीय सेवा योजना विभाग (एन. एस. एस.)

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यरत असून दरवर्षी २५० विद्यार्थ्यांना या विभागात प्रवेश दिला जातो. या विभागामार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. तसेच दत्तक गावात सात दिवसाचे श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले जाते. या विभागात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे रितसर अर्ज करावा लागतो.

## ■ राष्ट्रीय छात्रसेना विभाग (एन.सी.सी.)

महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेना विभाग कार्यरत असून दरवर्षी ५२ विद्यार्थ्यांना या विभागात प्रवेश दिला जातो. यापैकी तीस टक्के जागा मुलींसाठी राखीव राहतील.या विभागात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय छात्रसेना विभागाकडे रितसर अर्ज करावा लागतो. दर वर्षी ५६ महाराष्ट्र बटालियन अंतर्गत पारदर्शक पध्दतीने भरती प्रक्रीया पार पाडली जाते.

## ■ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी नाविन्यपूर्ण योजनेतून तालुकास्तरीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आपल्या महाविद्यालयाला मंजूर केले आहे. या संधीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा घेऊन प्रवेश दिला जातो.

## ■ कॉमन रुम

मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र कॉमन रुमची उपलब्धता आहे. याठिकाणी मुले किंवा मुली विश्रांती घेऊ शकतात. तसेच आपल्या वैयक्तिक गोष्टींना त्यांना वेगळी मुभा मिळते.

## ■ पार्किंग व्यवस्था

महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे दुचाकी व चारचाकीसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये महाविद्यालयाच्या संरक्षक भिंतीला लागून दुचाकीस्वारांसाठी पार्किंग व्यवस्था आहे तर चारचाकी साठी संरक्षण भिंतीच्या आत व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर महाविद्यायाच्या जिम शेजारी दुचाकीसाठी अधिकची पार्किंग व्यवस्था पुरविली आहे. पार्किंगमध्ये सीसीटीव्हीची यंत्रणा कार्यरत आहे. याबरोबरच इलेक्ट्रिक दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी चार्जिंग करता मोफत इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंट गडहिंग्लज नगरपालिकेच्या सहकार्याने पुरविला आहे.

## ■ उपहारगृह

महाविद्यालयामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना माफक दरात अल्पोपहाराची सोय व्हावी, यासाठी दोन उपहारगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. याचबरोबर Lunch Lounge अशी कल्पनाही राबविण्यात आली आहे. उपहारगृहामध्ये स्वच्छतेबाबत प्रथम प्राथमिकता दिली जाते. उपहारगृहातील खाद्यपदार्थ बनविताना दर्जेदार साहित्याचा वापर करावा, याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर पोषणमूल्य असलेली खाद्यपदार्थ माफक दरात उपलब्ध पुरविण्याचे सुचविले आहे.

## ■ मुलींचे वसतीगृह

ग्रामीण व दुर्गम भागातून येणाऱ्या मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या सहकार्यने वसतिगृह बांधले आहे. या वस्तीगृहामध्ये शंभर मुली राहू शकतील इतकी क्षमता आहे. वसतिगृहातील राहण्याच्या खोल्या ह्या हवेशीर प्रशस्त व सर्व आवश्यक भौतिक सुविधांसह समृध्द आहेत. वसतिगृहाची स्वच्छता नियमित ठेवली जाते. वसतिगृहामध्ये राहणाऱ्या मुलींसाठी वायफाय, अंघोळीसाठी गरम पाणी, स्वच्छ पिण्याच्या पाण्यासह सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. वसतिगृहाचा परिसर बंदिस्त असून सीसीटीव्हीच्या नियंत्रणाखाली आहे. त्यामुळे मुली अधिक सुरक्षित राहतात. वसतिगृहाच्या छतावर गरम पाण्यासाठी सौर उर्जेचा संच बसविण्यात आलेला आहे. वसतीग्रहाच्या प्रत्येक मजल्यावर सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन बसविण्यात आले आहे.

## ■ सौरउर्जा

अपारंपारिक ऊर्जेचे महत्त्व ओळखून महाविद्यायाने सौर उर्जा प्रकल्प इमारतीच्या छतावर बसविला आहे. महाविद्यायातील अत्यावश्यक विभाग सौर उर्जा प्रकल्पामुळे नियमित सुरु राहतात. या ४० किलो वॅटच्या प्रकल्पाद्वारे निर्माण होणारी वीज ही महाविद्यालयाला लागणाऱ्या नियमित विजेपेक्षा अधिक होते. या सौर उर्जेचा वापर करुन पर्यावरणपूरक निर्णय घेतला आहे.

## ■ वॉटर प्युरीफायर

महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थी, पालक, स्टाफ व अभ्यागतांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोयव्हावी, याकरिता प्रतिदिन २००० लिटर क्षमतेचा वॉटर प्यूरिफायर विद्या संकुलाचे संचालक मा. राजेंद्र मांडेकर यांच्या सहकार्याने बसविण्यात आला आहे. याद्वारे थंड व सर्वसामान्य तापमानाचे पिण्यायोग्य पाणी मिळते. पाणी पिण्यायोग्य आसलेबाबत प्रमाणपत्र मान्यता प्राप्त Water Testing Laboratory कडून प्राप्त झाले आहे. वॉटर प्युरिफायरची स्वच्छता दर महिन्याला पहिल्या आठवड्यामध्ये केली जाते.

## ■ अग्नी शामक साधन

सुरक्षितेसाठी आवश्यक त्या सर्व ठिकाणी जसे प्रयोगशाळा ग्रंथालय कार्यालय इत्यादी ठिकाणी अग्निशामक साधने बसविण्यात आली आहेत. अग्निशामक साधनांच्या मुळे आगी पासून जीवित व मालमत्तेचे संरक्षण होते. दरवर्षी या अग्निशामक साधनांचे पुनर्भरण केले जाते.

## * प्राध्यापक वृंद (अनुदानित) २०२३-२४*

| अ. क्र. | अधिव्याख्यात्याचे नाव | विषय | शैक्षणिक अर्हता | अधिव्याख्याता नियुक्ती | सेवा निवृत्त दिनांक | शैक्षणिक अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. एस. एम कदम (प्राचार्य)<br>नियुक्ती दि. २५/०२/२०२२ | पदार्थ विज्ञान | एम. एस्सी. पीएचडी. | कायम | २४/०२/२०२७ | ३७ वर्षे |
| २ | श्री. एस. एस. पंगम | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी, सेट | कायम | ३०/४/२०५४ | ७ महिने |
| ३ | डॉ. व्ही. एस. सावंत | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| ४ | श्री. जी. एस. पाटील | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी, सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ४ वर्षे |
| ५ | डॉ. पी. बी. गंदुगडे | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी, नेट, सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| ६ | डॉ. पी. आर. जाधव | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| ७ | डॉ. पी. बी. सरनोबत | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. नेट, सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| ८ | श्री. के. एम. गुरव | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| ९ | श्रीमती एस. ए. सावंत | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| १० | श्रीमती आर. के. शिंदे | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| ११ | डॉ. ए. एम. हासूरे | रसायनशास्त्र | एम.एस्सी. पीएचडी | कायम | ३१/१०/२०२६ | ३५ वर्षे |
| १२ | डॉ. पी. आर. डोंगरे | रसायनशास्त्र | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| १३ | श्री. एन. आर. भोसले | रसायनशास्त्र | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| १४ | डॉ. ए. जी. नाईकवाडे | रसायनशास्त्र | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| १५ | डॉ. एस. के. पाटील | रसायनशास्त्र | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| १६ | श्री. व्ही. ए. कुराडे | रसायनशास्त्र | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | २ वर्षे |
| १७ | डॉ. आर. सी. पाटील | रसायनशास्त्र | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | २ वर्षे |
| १८ | श्री. एस. बी. नाईक | रसायनशास्त्र | एम.एस्सी. नेट, सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| १९ | श्री. के. जे. अदाटे | प्राणीशास्त्र | एम.एस्सी. | कायम | ३०/४/२०३५ | २५ वर्षे |
| २० | डॉ. व्ही. एम. देशमुख | प्राणीशास्त्र | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| २१ | डॉ. एस. बी. पाटील | प्राणीशास्त्र | एम.एस्सी. पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| २२ | श्री. व्ही. ए. सरदेसाई | वनस्पतीशास्त्र | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| २३ | श्रीमती एन. के. लोंढे | संख्याशास्त्र | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ४ वर्षे |
| २४ | श्रीमती पी. एम. जाधव | संख्याशास्त्र | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| २५ | श्री. एस. एस. कांबळे | गणित | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |

| अ. क्र. | अधिव्याख्यात्याचे नाव | विषय | शैक्षणिक अर्हता | अधिव्याख्याता नियुक्ती | सेवा निवृत्त दिनांक | शैक्षणिक अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | श्रीमती डी. एस. खांडेकर | संगणकशास्त्र | एम.एस्सी. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| २७ | श्रीमती एस. जी. शिंदे | संगणकशास्त्र | एम.एस्सी. सेट, नेट पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| २८ | श्री. डी. यु. जाधव | इंग्रजी | एम.एस्सी. सेट | कायम | ३१/७/२०४७ | १० वर्षे |
| २९ | श्रीमती पी. ए. पाटील | इंग्रजी | एम.एस्सी. सेट | कायम | ३०/६/२०४९ | ७ महिने |
| ३० | श्रीमती पी. एस. बाळेशगोळ | इंग्रजी | एम.ए., बी.एड. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | २ वर्षे |
| ३१ | श्री. व्ही. एस. दानवडे | इंग्रजी | एम. ए., सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| ३२ | श्री. आर. व्ही. गाडेकर | इंग्रजी | एम. ए. नेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| ३३ | श्री. ए. ए. परीट | इंग्रजी | एम. ए. सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| ३४ | डॉ. एम. व्ही. राजे | मराठी | एम. ए., नेट, पीएचडी | कायम | ३१/५/२०२६ | ३० वर्षे |
| ३५ | डॉ. ए. के. मोरमारे | मराठी | एम. ए., नेट, पीएचडी | कायम | ३०/६/२०३४ | २४ वर्षे |
| ३६ | डॉ. एस. एस. पाटील | मराठी | एम. ए., पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| ३७ | डॉ. एन. बी. एकिले | हिंदी | एम. ए., नेट, एमफिल,पीएचडी | कायम | ३०/६/२०४४ | १५ वर्षे |
| ३८ | डॉ. एस. बी. माने | हिंदी | एम. ए., पीएचडी | कायम | ३०/६/२०३५ | १३ वर्षे |
| ३९ | डॉ. एस. डी. सावंत | समाजशास्त्र | एम. ए., नेट, एमफिल,पीएचडी | कायम | ३१/७/२०३५ | १९ वर्षे |
| ४० | डॉ. आर. पी. हेंडगे | समाजशास्त्र | एम. ए., नेट, सेट, एमफिल,पीएचडी | कायम | ३१/८/२०४३ | १३ वर्षे |
| ४१ | डॉ. ए. जे. हरदारे | राज्यशास्त्र | एम. ए., नेट, एमफिल,पीएचडी | कायम | ३१/३/२०३६ | १६ वर्षे |
| ४२ | श्री. एस. एम. पाटील | मानसशास्त्र | एम. ए., नेट, सेट | तासिका तत्वावरील शिक्षक | – | १ वर्षे |
| ४३ | डॉ. जी. जी. गायकवाड | अर्थशास्त्र | एम. ए., नेट, बीलीप,पीएचडी | कायम | ३१/३/२०३९ | १६ वर्षे |
| ४४ | डॉ. बी. एम. जाधव | अर्थशास्त्र | एम. ए., नेट, सेट, पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| ४५ | डॉ. व्ही. के. हेरेकर | अर्थशास्त्र | एम. ए., सेट, एमफिल,पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | ५ वर्षे |
| ४६ | डॉ. डी. पी. खेडकर | कॉमर्स | एम.कॉम., एमफिल,पीएचडी | कायम | ३१/१/२०४४ | १४ वर्षे |
| ४७ | डॉ. एम. डी. चौगुले | कॉमर्स | एम.कॉम.,पीएचडी | कायम | ३१/१२/२०३७ | १० वर्षे |
| ४८ | डॉ. जी. एम. कुलकर्णी | कॉमर्स | एम.कॉम.,पीएचडी | तासिका तत्वावरील शिक्षक | – | २ वर्षे |
| ४९ | डॉ. आर. डी. मगदूम | शा. शिक्षण | बी.कॉम. एमपीएड, पीएचडी | कायम | ३१/१/२०४२ | १६ वर्षे |
| ५० | श्री. एस. आर. कुराडे | ग्रंथपाल | बी.एस्सी., एम.लिब., सेट | कायम | ३०/३/२०३६ | १२ वर्षे |

## * प्राध्यापक वृंद (विनाअनुदानित) २०२३-२४ *

| अ.क्र. | अधिव्याख्यात्याचे नाव | विषय | शैक्षणिक अर्हता | अधिव्याख्याता नियुक्ती | शै. अनुभव | निवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. ए. यु. पटेल | बी.बी.ए. | एम.ए., एमफिल | – | – | – |
| २ | सौ. टी. एस. मस्ती | बी.बी.ए. | एम.कॉम, बी.एड., एमफिल | – | – | – |
| ३ | सौ. वाय. व्ही. सोनटक्के | बी.बी.ए. | एम.कॉम. एमपीएम.,डीएलएल | – | – | – |
| ४ | कु. एस. डी. निकम | बी.बी.ए. | एम.बी.ए. | – | – | – |
| ५ | सौ. आर. एम. फर्नांडीस | बी.सी.ए. | बी.एस्सी.,एम.सी.ए. | – | – | – |
| ६ | श्री. रोहण पाटील | बी.सी.ए. | बीईआयटी | – | – | – |
| ७ | सौ. आर. एम. जाधव | बी.सी.ए. | एम.बी.ए एमफिल, नेट | – | – | – |
| ८ | के. एस. देसाई | बी.सी.ए. | बी.एस्सी. एमसीएम, एमसीए | – | – | – |
| ९ | सौ. यु. एस. पाटील | बी.सी.ए. | एमसीए | – | – | – |
| १० | सौ. पी. पी. आजरी | बी.सी.ए. | बी.ई. (कॉम्प्यु.इंजी.) | – | – | – |
| ११ | कु. डी. सी. लोंढे | बी.सी.एस. | एम.एस्सी (कॉम्प्यु.सायन्स) | – | – | – |
| १२ | श्री. आर. बी. खोत | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.एस्सी (कॉम्प्यु.सायन्स) | – | – | – |
| १३ | कु. एम. आर. दुंडगे | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.एस्सी (स्टॅट) | – | – | – |
| १४ | कु. डी. सु. महाजन | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.एस्सी (कॉम्प्यु.सायन्स) | – | – | – |
| १५ | श्री. एन. जी. चव्हाण | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.एस्सी (इलेक्ट्रॉनीक) | – | – | – |
| १६ | श्री. पी. एल. यमगेकर | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | बी.ई. (इलेक्ट्रॉनीक इंजी.) | – | – | – |
| १७ | श्री. बी. ए. देसाई | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.एस्सी (कॉम्प्यु.सायन्स) | – | – | – |
| १८ | श्री.यु. पी. कानडे | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.सी.ए. | – | – | – |
| १९ | श्री. यु. बी. पाटील | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.ई. (कॉम्प्यु.सायन्स) | – | – | – |
| २० | कु. पी. बी. पाटील | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.एस्सी (कॉम्प्यु.सायन्स) | – | – | – |
| २१ | श्री. वाय. बी. पाटील | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.सी.ए. | – | – | – |
| २२ | कु. एस. डी. नार्वेकर | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | बी.टेक. (कॉम्प्यु.सायन्स) | – | – | – |
| २३ | श्री. एस. एस. कांबळे | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | एम.एस्सी सेट | – | – | – |
| २४ | सौ. एस. एम. हुंदळे | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | बी.ई., सी.एस. | – | – | – |
| २५ | कु. एन. एन. कांबळे | बी.सी.एस. (बीएस्सी.सीएस.) | बी.ई. | – | – | – |
| २६ | सौ. एन. एच. हासुरे | बी.एस्सी. (बीएस्सी.सीएस.) | एम.ई, बी.ईड. | – | – | – |
| २७ | कु. टी. ए. काझी | बी.एस्सी. फुड सायन्स | एम.टेक, नेट, सेट, पीएचडी | – | – | – |
| २८ | सौ. आर. टी. दळवी | बी.एस्सी. फुड सायन्स | एम.एस्सी. | – | – | – |
| २९ | सौ. एन. बी. नाईक | बी.एस्सी. फुड सायन्स | एम. एस्सी. | – | – | – |
| ३० | श्री. के. जी. हारळे | बी.एस्सी. फुड सायन्स | एम. टेक. | – | – | – |
| ३१ | श्री. बी. एस. पठाण | बी.एस्सी. ॲनीमेशन | एम.एस्सी. (आय.टी), बी.ईड. | – | – | – |
| ३२ | श्री. ओ. आर. पाटील | बी.एस्सी. ॲनीमेशन | डिपा. ॲनीमेशन | – | – | – |

## ✻ प्रशासकीय विभाग ✻

### ✻ कार्यालय विभाग

| | |
|---|---|
| डॉ. संतोष शहापूरकर | प्रबंधक |
| श्री. के. टी. कुंभार | कनिष्ठ लघुलेखक |
| श्री. एन. एस. कांबळे | कनिष्ठ लेखनिक |
| श्री. ए. एम. पोवार | कनिष्ठ लेखनिक |
| श्री. एन. झेड. दळवी | कनिष्ठ लेखनिक |
| श्री. बी. बी. जाधव | कनिष्ठ लेखनिक |
| श्री. पी. डी. सोरप | कनिष्ठ लेखनिक |
| श्री. ए. एच. नाईक | शिपाई |
| श्री. व्ही. एस. गुरव | शिपाई |
| श्री. के. एम. सुर्यवंशी | शिपाई |
| श्री. एस. जी. हिले | शिपाई |

### ✻ प्रयोगशाळा विभाग

| | |
|---|---|
| श्री. एस. व्ही. शिंदे | प्रयोगशाळा सहाय्यक |
| श्री. सी. आय. बाबर | प्रयोगशाळा सहाय्यक |
| श्री. पी. एस. पाटील | प्रयोगशाळा सहाय्यक |
| श्री. टी. आर. देवडकर | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. व्ही. व्ही. कोंडूसकर | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. टी. बी. कांबळे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. आर. के. वडर | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एस. एम. मोरबाळे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. के. आर. कांबळे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एस. एम. कांबळे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. व्ही. बी. पाटील | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. डी. जी. हुंदळेकर | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एस. एन. पाटील | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. यु. डी. राऊत | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एम. के. गोटुरे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. व्ही. एन. सुतार | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एन. टी. पाटील | प्रयोगशाळा परिचर |

### ✻ ग्रंथालय विभाग

| | |
|---|---|
| श्री. आर. ए. जाधव | सहाय्यक ग्रंथपाल |
| श्री. बी. एल. कोरवी | कनिष्ठ लेखनिक |
| श्री. ए. एल. कलकुटकी | ग्रंथालय परिचर |
| श्री. ए. एस. सावंत | ग्रंथालय परिचर |
| श्री. एन. बी. असोदे | ग्रंथालय परिचर |
| श्री. एम. बी. शिंदे | ग्रंथालय परिचर |
| श्री. एस. ए. शिरहट्टी | ग्रंथालय परिचर |

## ✻ प्रशासकीय विभाग (विना अनुदानित) ✻

**डॉ. आर. एन. निळपणकर** विभाग प्रमुख

| | |
|---|---|
| श्री. व्ही. एल. शिंदे | प्रशासन अधिकारी |
| सौ. एस. बी. निकम | लिपीक |
| सौ. एस. बी. आजरी | लिपीक |
| श्री. व्ही. एम. घेज्जी | लिपीक |
| श्री. वाय. एस. शेंडे | लिपीक |
| श्री. एस. जी. भाटले | लिपीक |
| श्री. जे. जे. पाटील | लिपीक |
| सौ. पी. ए. पाटील | लिपीक |
| श्री. एम. एम. नोरेंज | लिपीक |
| कु. के. टी, मळगेकर | लिपीक |
| सौ. के. एस. नाईक | लिपीक |
| श्रीमती आर. एन. पाटील | ग्रंथालय परिचर |
| श्री. डी. ए. मगदुम | ग्रंथालय परिचर |
| श्री. ए. आर. पाटील | ग्रंथालय परिचर |
| श्री. एस. बी. काटे | टेकनिकल हेड |
| श्री. आर. एन. कांबळे | हार्डवेअर इंजिनिअर |
| श्री. एन. डी. देसाई | हार्डवेअर इंजिनिअर |
| श्री. जी. डी. निढोरी | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. डी. के. पताडे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एस. एस. चौगुले | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. बी. जी. चौगुले | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. आय. बी. गोवेस | इलेक्ट्रिशियन |
| श्री. एस. टी. हजारे | शिपाई |
| श्री. एम. बी. रेडेकर | शिपाई |
| श्री. डी. एस. पाटील | शिपाई |
| श्री. एम. बी. यादव | शिपाई |
| श्री. एस. एस. गवळी | शिपाई |
| श्री. एस. जे. साबळे | शिपाई |
| श्री. एस. व्ही. पाटील | शिपाई |
| श्री. एस. डी. कांबळे | शिपाई |
| श्री. एच. टी. मकानदार | शिपाई |
| श्री. ए. एस. देसाई | शिपाई |
| श्री. ए. सी. देसाई | शिपाई |
| श्री. ए. एस. पाटील | शिपाई |
| श्री. एस. एस. कडूकर | शिपाई |
| श्री. टी. जी कुराडे | शिपाई |
| श्री. ए. एस. पालकर | शिपाई |
| श्री. जे. आर. माने | शिपाई |
| श्री. उदय राऊत | शिपाई |
| श्री. बी. एस. दोरुगडे | सेक्युरिटी गार्ड |

## ■ रॅगिंग बाबत नियम व शिस्त -

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे UGC REGULATIONS ON CURBING THE MENACE OF RAGGING IN HIGHER EDUCATION INSTITUTIONS, 2009 व नुसार महाविद्यायात रॅगिंग करणे हा गुन्हा आहे. यामध्ये ब्रामुख्याने पुढील गोष्टी येतात.

१) कोणीही विद्यार्थ्यांच्या बोलण्यातून, लिहिण्यातून असभ्य व उध्दट वागण्यातून नवागत विद्यशर्थ्यांना मानसिक, शारीरिक त्राव व गीती निर्माण होत असेल तर असे वर्तन.

२) महाविद्यालयातील विद्यार्थ्याला अशी कोणतीही कृती अथवा कार्य करण्यास सांगणे जे करताना त्याला लज्जेची भावना निर्माण होईल. किंवा त्याच्या शरीरावर विपरीत परिणाम होईल.

३) छेडछाड करणे, मारहाण करणे किंवा गुन्हेगारी शक्ती किंवा गुन्हेगार वापरणे, धमकावणे चुकीच्या पध्दतीने रोखणे किंवा बंदिस्त करणे किंवा गंभीर दुखापत करणे, अपहरण करणे, विनयभंग करणे किंवा अनैसर्गिक गुन्हा करणे किंवा मृत्यूस प्रर्वत करणे किंवा आत्महत्येस प्रवृत्त करणे.

रॅगिंगबाबत सविस्तर माहिती विद्यापीठ अनुदान आयोग लिंक – https://www.antiragging.in/ https://www.ugc.gov.in/Bureaus/bureaus_details?

शिवाजी विद्यापीठ लिंक – https://www.unishivaji.ac.in/student/Anti-Ragging,
वेबसाईट वर ठेवण्यात आली आहे.

## ■ प्लेसमेंट सेल

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच विविध क्षेत्रातील, देश विदेशातील नोकरी व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देणेसाठी प्लेसमेंट सेल कार्यरत आहे. या सेलच्यावतीने विविध क्षेत्रातील देशी–विदेशी कंपन्यांचे कॅम्पस्, इंटरव्ह्युज आयोजित केले जातात. यासाठी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी नोटीस बोर्डावर केलेल्या आवाहनानुसार या संधीचा लाभ घ्यावा.

## ■ करिअर कट्टा

### सेंटर ऑफ एक्सलन्स

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने शिवराज महाविद्यालयांमध्ये या शैक्षणिक वर्षापासून Centre of Excellence प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. Centre of Excellence च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या जाहिरातीची माहिती देणे, योग्य पद्धतीने कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, फॉर्म भरणे आणि परीक्षेची पूर्वतयारी करून घेणे, विद्यार्थ्यांचे समुपदेशन करणे इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत. याबरोबरच Centre of Excellence च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय संकल्पनांना विस्तारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक सल्लागार व्यक्तिंची उपलब्धता करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या राजकीय नेतृत्वाच्या विकासासाठी विद्यार्थी संसद व उद्योजकीय नेतृत्व विकासासाठी Student Startup Company ची स्थापना करण्यात येणार आहे.

### मोटार ड्रायव्हिंग स्कूल

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत महाविद्यालयास CSR प्रकल्पांतर्गत मोटार ड्रायव्हिंग स्कूल प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''करिअर कट्टा'' युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी ''आय ए एस आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला'' या अनुषांगाने मोफत कोर्सेस यासाठी नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ७५०७६५२५५५ या नंबर व आपले नांव वॉटस्अप करा. अधिक माहितीसाठी डॉ. एन. बी. एकिले (मोबा. ९६६५९३१३९८) यांच्याशी संपर्क करावा.



## * महाविद्यालयाच्या वेळा *

| | |
|---|---|
| ● साहित्य व वाणिज्य | सकाळी ०७.२० ते दुपारी १२.३५ |
| ● शास्त्र शाखा (बॅच नुसार) | सकाळी ०७.२० ते सायं. ०६.१५ |
| ● कार्यालयीन वेळ | सकाळी ०९.०० ते दुपारी ०१.००<br>दुपारी ०१.१० ते सायं. ०५.०० |
| शनिवार – | सकाळी ०९.०० ते दुपारी ०१.०० |
| ● ग्रंथालय वेळ | सकाळी ०७.०० ते सायं. ०६.०० |
| ● परीक्षा कालावधीमध्ये अभ्यासिका | सकाळी ०७.०० ते रात्री १२.०० |

## ● रविवार साप्ताहिक सुट्टी ●

- नेहमी सूचना फलक पहावा.
- महाविद्यालयाचा ऑफीस ब्लॉग, वेब साईट, ई–मेल नियमित पाहावे
- परिक्षा संदर्भात विद्यापीठाकडून प्राप्त झालेला I.D. व Password जतन करून ठेवावा.
- १ जुलै २०२३ पासून महाविद्यालय नियमितपणे सुरु होत आहे.

● **शिस्तिचे नियम** – महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेच्या सदस्यत्वासाठी शेवटच्या वर्षातील टी. वाय.– बी. ए./ बी. कॉम.,/ बी. एस्सी. च्या विद्यार्थानी आपला पासपोर्ट साईजचा फोटो, टेलिफोन नंबर व कायमचा पत्ता वगैरे माहिती प्रवेश अर्जामध्ये भरुन द्यावी.

● **महत्वाचे** – सर्व विद्यार्थ्यांने विद्यापीठ परिक्षा, सर्व शिष्यवृत्ती यासाठी महाविद्यालयाचा ऑफीस ब्लॉग Shivrajcollegeoffice.blogspot.com बेबसाईट www.shivraj.edu.in पहावा.

ठिकाण – गडहिंग्लज

प्राचार्य
**डॉ. एस. एम. कदम**
शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम
विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.
मोबा. : ९४२१९७५७९१

दूरध्वनी क्र. : कार्यालय – (०२३२७) २२२३०७

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज संचलित

# शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस्. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचाराने प्रेरित होऊन वाटचाल करीत असलेले महाविद्यालय.
- 'नॅक' कडून पूर्नमूल्यांकनामध्ये 'ए' मानांकन. (CGPA 3.15)
- ६० वर्षाची समृद्ध परंपरा.
- तज्ज्ञ, उच्चविद्याविभूषित व्यासंगी व अनुभवी प्राध्यापक वर्ग.
- तत्पर व कुशल प्रशासन.
- साहित्य, वाणिज्य, विज्ञान, संगणक शास्त्र, व्यवस्थापन शास्त्र इ. विद्याशाखांनी परिपूर्ण महाविद्यालय.
- अकरावीपासून पदव्युत्तर वर्गापर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था : एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र), एम.कॉम. (अकौंटन्सी), एम.एस्सी (कॉम्प्युटर सायन्स,ऑरगॅनिक केमेस्ट्री, सुक्ष्म जिवशास्त्र), एम.बी.ए. आणि एम.फिल. व पीएच्. डी. मार्गदर्शन.
- शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण अभ्यासकेंद्र.
- भव्य क्रीडांगण, विद्यार्थी–विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र जीम.
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविण्याची उज्ज्वल परंपरा.
- समृध्द ग्रंथालय, प्रशस्त अभ्यासिका, बुक बँक योजना, विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धती, स्पर्धा परीक्षेसाठी स्वतंत्र अभ्यासिका, गोविंदराव पानसरे अध्यासन.
- महाविद्यालयाची प्रशस्त इमारत, संगणकीकृत कार्यालय, अद्ययावत प्रयोगशाळा, कँटीन सुविधा.
- विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुविधा.
- केंद्र शासन, राज्य शासन, शिवाजी विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या अनेक शिष्यवृत्त्या व सवलती.
- 'कमवा व शिका' योजनेसह गरजू विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आत्मसन्मान जपणारे व्यवस्थापन. कर्मवीर वि. रा. शिंदे विद्यार्थी दत्तक योजना.
- एन्. सी. सी., एन्. एस्. एस्., विविध सांस्कृतिक मंडळ आणि विविध अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रम.
- हुशार विद्यार्थ्यांसाठी विशेष वैयक्तिक मार्गदर्शन, अप्रगत विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सुधार वर्ग, सांस्कृतिक मार्गदर्शनाच्या खास योजना.
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, शिवराज अॅकॅडमी मार्फत पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण.
- प्लेसमेंट सेलच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी देश विदेशातील कंपनीसाठी कॅम्पस इंटरव्ह्यूज आयोजन.
- महाविद्यालयात WI-FI सुविधा उपलब्ध.
- सर्व विद्यार्थ्यांसाठी करिअर ओरिएन्टेड, अॅडऑन आणि व्हॅल्यू अॅडेड कोर्सेसची सुविधा.
- सन २०१५–२०१६ शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत निमशहरी गटात कला शाखेस आणि सन २०१८–१९, २०२०–२१, २०२१–२२ व २०२२–२३ विज्ञान शाखेस प्रथम क्रमांक प्राप्त.
- शिवाजी विद्यापीठ मधील गुणवत्ता यादीत महाविद्यालयातील विद्यार्थी यशस्वी.
- महाविद्यालयास शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट एकक म्हणून सन २०१९–२० जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळाला.

**✻ टीप : महाविद्यालय परिसरात अनधिकृत व्यक्तीस प्रवेशास सक्त मनाई आहे.**

# * शिस्तीचे नियम *

**महाविद्यालयाच्या लौकिकात भर टाकण्यासाठी शिस्तीचे नियम विद्यार्थी व पालक यांचेवर बंधनकारक आहेत.**

१) वर्ग, ग्रंथालय, क्रीडांगण व परिसरातील वर्तन सभ्यता व सुसंस्कृतपणा दाखवणारे हवे.

२) कामाशिवाय महाविद्यालयाच्या परिसरात/व्हरांड्यात भटकणे हे बेशिस्त वर्तन मानले जाईल.

३) महाविद्यालयाच्या मालमत्तेचे, वर्गातील फर्निचरचे नुकसान शिस्तभंग समजण्यात येईल.

४) विद्यापीठ परीक्षेस बसण्यापूर्वी संपूर्ण शैक्षणिक वर्षात संबंधित विद्यार्थी/विद्यार्थिनीची ८०% उपस्थिती आवश्यक.

५) परवानगी शिवाय गैरहजर राहिलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनींची नावे हजेरीपटावरुन कमी करण्यात येतील.

६) प्रत्येक विद्यार्थी/विद्यार्थिनींनी आपल्या सोबत महाविद्यालयाचे ओळखपत्र बाळगणे आवश्यक असून ते खिशात न ठेवता समोर ठळक दिसेल असे लावणे अनिवार्य आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक अथवा प्रशासकीय कर्मचारी यांनी मागणी केल्यास ओळखपत्र दाखविणे हे सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनींना बंधनकारक राहील. महाविद्यालयाच्या आवारात, वर्गात, क्रीडांगणावर, समारंभप्रसंगी, परीक्षेच्या ठिकाणी हे ओळखपत्र विद्यार्थ्याजवळ नेहमी असावयास हवे. नसल्यास ती गंभीर बाब समजण्यात येईल व तो /ती कारवाईस पात्र होईल.

७) विद्यार्थी/विद्यार्थिनींनी महाविद्यालयाने जाहीर केलेल्या सर्व उपक्रमात सहभागी झाले पाहिजे.

८) एन. सी. सी., एन. एस. एस. व क्रीडा विभाग यामध्ये विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना योग्य ती संधी देण्यात येईल. त्यासाठी संबंधित विभागाचे नियम बंधनकारक राहतील.

९) व्यक्तिमत्व विकास व चारित्र्यसंवर्धन हा शिक्षणाचा पाया असून शिस्तीचे नियम पाळून विद्यार्थ्यांनी संधीचा लाभ घ्यावा.

१०) महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार महाविद्यालयाच्या आवारात धूम्रपानास सक्त मनाई आहे.

११) पर्यावरणाची आस्था वाढीस लागण्यासाठी महाविद्यालयाच्या मास्टर प्लॅनमध्ये संपूर्ण परिसर हरित करण्याकडे लक्ष दिले आहे. त्यास बाधा येईल असे कृत्य करु नये.

१२) विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर लक्ष केंद्रीत करुन आम्ही अंतर्गत मूल्यमापन पध्दती सुरु केली आहे. तोंडी परीक्षा, घटक चाचणी, सहामाई व पूर्व परीक्षा घेतल्या जातील. या परीक्षांना बसणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

१३) विद्यार्थ्यांनी तंग व भडक रंगाचे कपडे घालून महाविद्यालयात प्रवेश करु नये. भडक पोशाखास सक्त मनाई आहे.

१४) प्रात्यक्षिकांच्या वेळी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी ॲप्रन (Apron) वापरावा.

१५) महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेच्या सदस्यत्वासाठी शेवटच्या वर्षातील टी.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांनी आपला पासपोर्ट साईजचा फोटो, टेलिफोन नंबर व कायमचा पत्ता वगैरे माहिती प्रवेश अर्जामध्ये भरुन द्यावी.

१६) प्रत्येक विद्यार्थ्याला रॅगिंग प्रतिबंधक प्रतिज्ञापत्रक भरुन देणे बंधन कारक राहील.

*** टीप : महाविद्यालय परिसरात अनधिकृत व्यक्तीस प्रवेशास सक्त मनाई आहे.**